महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वानी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५५८ दि. ०४ / ०७ / २०१७

**विषय :** महावितरण कंपनीतील कार्यरत मुकबधीर तसेच श्रवण शक्तीतील दोष असलेल्या कर्मचाऱ्यांना वाहतूक भत्ता मंजूर करणेबाबत.

**संदर्भ :** शासन निर्णय क्र. वाहभ-२०१४/प्र.क्र.१६/सेवा-५, दि. १८.०४.२०१७.

........

महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन (सिव्हील) क्र.१०७/२०११ मध्ये दि.१२.१२.२०१३ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने केंद्र सरकारने पारित केलेल्या दि.१९.०२.२०१४ च्या कार्यालयीन ज्ञापनाच्या धर्तीवर शासन निर्णय क्र.वाहभ-२०१४/प्र.क्र.१६/सेवा-५ दि.१० ऑगष्ट २०१५ व शुध्दीपत्रक दि.०४.०६.२०१४ मध्ये नमूद केलेल्या दराने शासनामध्ये कार्यरत मुकबधीर कर्मचाऱ्यांना (deaf and dumb), अंध व अस्थिव्यंगाने अधू कर्मचाऱ्यांना (Blind and Orthopaedically handicapped employees) वाहतूक भत्ता मंजूर केलेला आहे. याच धर्तीवर महावितरण कंपनीने कंपनीत कार्यरत मुकबधीर कर्मचा-यांना (deaf and dumb) प्रशासकीय परिपत्रक क्र.५५२ दि.१३.०१.२०१७ नुसार वाहतूक भत्ता मंजुर करण्याबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचे शासन पुरकपत्र क्र.वाहभ-२०१४/प्र.क्र.१६/सेवा-५ दि.१८.०४.२०१७ अन्वये अपंग व्यक्तीसाठीच्या (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील कलम २(एल) मध्ये केलेल्या श्रवण शक्तीतील दोष (Hearing impairmaent) च्या व्याख्येनुसार - Hearing impairmaent means loss of sixty decibels or more in the in the better ear in the conversational rangae of frequencies असा श्रवणदोष असणा-या कर्मचा-यांना अंध, अस्थिव्यंगाने अधू व कण्याच्या विकाराने पिडीत असणा-या राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचा-यांना अनुज्ञेय केलेल्या दराने, वाहतूक भत्ता अनुज्ञेय केलेला आहे. [Transport Allowance is made admissible to the Hearing impaired employess, having loss of ६० decibles or more in the better ear the conversational range of frequencies as provided in Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights And Full Participation) Act, १९९५, as admissible at the rate equal to blinds, orthopaedically handicapped and Hunchback disability state Goverment employees.] शासन निर्णयाच्या धर्तीवर महावितरण कंपनीमधील मुकबधीर तसेच श्रवण शक्तीतील दोष असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना वाहतूक भत्ता मंजूर लागू करण्याची बाब विचारधीन होती.

३. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचारविनीमय करुन महावितरण कंपनीतील मुकबधीर तसेच श्रवण शक्तीतील दोष असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना मुकबधीर अधिकारी/ कर्मचारी यांच्याप्रमाणे शासनाच्या धर्तीवर वाहतुक भत्ता लागू करण्याकरीता मंजूरी प्रदान केली आहे.

४.	त्यानुसार महावितरण कंपनीमधील पात्र मुकबधीर तसेच श्रवण शक्तीतील दोष असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना द्यावयाच्या वाहतूक भत्याचे दर खालील प्रमाणे असतील.

| अ.क्र | कर्मचा-यांची वेतनश्रेणी | दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रुपये) | |
|---|---|---|---|
| | | "अ-१" आणि "अ" वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| १. | रु.२४७६५ - ५५०८० किंवा त्याहून वरच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे अधिकारी | ४८०० | २४०० |
| २. | रु.१६४३५-४२११० किंवा त्याहून वरच्या परंतू रु. २४७६५ - ५५०८० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे अधिकारी/कर्मचारी | २४०० | २००० |
| ३. | रु.१६४३५-४२११० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी | २००० | २००० |

५.	मुकबधीर तसेच श्रवण शक्तीतील दोष असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना उपरोक्त दराने वाहतूक भत्ता खालील अटींच्या अधीन राहून अनुज्ञेय करण्यात यावा.

क)	उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केलेली "अ-१" आणि "अ" वर्ग शहरे स्थानिक पूरक भत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या शहराच्या वर्गीकरणाप्रमाणे राहतील.

ख)	कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांचा एकत्र परिसर असेल अशा ठिकाणी राहणा-या कर्मचा-यांना वरील तक्त्यात नमूद केलेल्या दराच्या निम्म्या दराने, मात्र अशा प्रकारे दर निम्मा केल्याने तो रुपये २००० /- पेक्षा कमी होत असल्यास, किमान रुपये २०००/- या दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात येईल.

ग)	ज्या कर्मचा-यांना म.रा.विद्युत वितरण कंपनीकडून वाहतूक सुविधा (Company Transport) पुरविण्यात आली आहे त्यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

घ)	रजा, प्रशिक्षण, दौरा इत्यादी कारणांमुळे ३० दिवसांपेक्षा जास्त अनुपस्थितीच्या कालावधीसाठी हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

च)	मुकबधीर तसेच श्रवण शक्तीतील दोष असल्यास शासकीय रुग्णालयाच्या नाक-कान-घसा विभाग प्रमुखांचे शिफारस प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

छ)	शासकीय रुग्णालयाच्या नाक-कान-घसा विभाग प्रमुखांचे शिफारस प्रमाणपत्र ज्या दिवशी प्राप्त होईल त्या दिनांकापासून किंवा या प्रशासकीय परिपत्रकाचा दिनांक यापैकी जो दिनांक नंतरचा असेल त्या दिनांकापासून सदर वाहतूक भत्ता मंजूर करण्यात यावा.

६.	सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या RAPDRP पोर्टलवर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Circular-F.N.5.doc*